# समजुतीचा करारनामा

समजुतीचा करारनामा आज रोजी ........... दि. माहे ...

........... सन .............. इसवी ते दिवशी

चहा आण मी

तर्फे संचालक

ची...........

वय...... वर्षे धंदा ...........

मु. पो/ पत्ता ...

फ्रॅन्चायझर / लिहुन घेणार)

( येथून पुढे या करारनामा फ्रॅन्चायझर यांना लिहुन घेणार असे संबोधले आहे.)

यांसी

...................

ची ................

वय..... वर्षे ....... धंदा –.......

फ्रॅन्चायझी यांना लिहुन देणार असे संबोधले आहे.)

कारणे समजुतीचा करारनामा लिहुन देतो तो येणेप्रमाणे—/

अ) सदर चहा आणि मी हि नोंदणीकृत कंपनी असून चहा पेय या व्यवसायात चहा आणि मी हि नोंदणीकृत कंपनी असुन चहा पेय या व्यवसायात चहा आणि मी'' या व्यापार चिन्ह व खूण ब्रॅड, ट्रेडमार्क लोगो या नावाने बाजारामध्ये नावलोकीक मिळविलेला आहे.

चहा या पेयावर लिहुन घेणार यांनी मागील सुमारे दोन ते तीन वर्षापासून वेगवेगळया पध्दतीने प्रयोग करून प्रंचड मेहनतीने उत्कृत्ट चहा बनविन्याचे सुथ/तंथ विकसित केले आहे.

अशाप्रकारे फ्रेंन्चायझर यांना चहा पेय, चहा पावडर, चहा मसाला व इतर आवश्यक साहीत्य, वस्तु यांचे संपूर्ण ज्ञान व त्या संबधी अनुभव आत्मसात केला आहे.

तसेच कंपनीने चहा व्यवसायाची स्थापना वैशिष्ट पुर्ण पध्दतीने विकास याची अदितीय/नावीन्यपुर्ण अशी कार्यपध्दती विकसित केली आहे. लिहुन घेणार कंपनीने फ्रेंन्चायझी देण्याचा कार्यक्रम विकसित केला असून विशिष्ट पायता असलेल्या व्यवनींना व्यवसाय

वाठविण्याचे दृष्टीकोनातुन चहा आणि मी'' या व्यापार चिन्ह, खुण, ब्रॅण्डने फ्रॅन्चायझी देण्याचे ठरवीले.

ब) सदरील कराराच्या लिहुन घेणार व लिहुन देणार यांचे दरम्यान ठरलेल्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१) लिहुन घेणार कंपनी हि लिहुन देणार यांस चहा आणि मी या कंपनीची चहा पेण्याची फ्रॅन्चायझी म्हणून नेमणूक करीत आहे.

सदर लिहुन देणार यांचे अधिकारी हे अहस्तांतरणीय असतील. फ्रॅन्वचाईज कराराचा कालावधी हा......... वर्षाचा असून तो दिनांक ......... ते .......... असा राहिल सदरील कराराची मुदत संपल्यानंतर लिहुन देणार व लिहुन घेणार यांनी एकमेकांचे संमतीने कराराची मुदत वाढवीण्याची आहे.

व तसा नवीन करारनामा करावयाचा आहे.

सदरील कराराचा लॉक कालावधी हा सुध्दा ...... वर्षाचा राहील. या कालावधी लिहुन देणार हे सदर करार रदद् करू शकणार नाहीत. जर कुठल्याही कारणास्तव

लिहुन देणार हे व्यवसाय करण्यास समर्थ नसतील तर अनामत रक्कमेचा पातावा मिळणार नाही.

२) सदर व्सवसाय करण्यासाठी जागेची निवड हि लिहुन देणार यांनी करावयाची असुन लिहुन घेणार यांनी त्यास समंती दयावयाची आहे.

सदर व्यवसाय करण्यासाठी लागणारी जागा हि लिहुन देणार यांच्या मालकीची असावी तसे नसेल तर लिहुन देणार यांनी रितसर स्वत:चे नावाने लिव्ह अॅण्ड लायसन्स अथवा लिजने घेतलेली असावी व सदर भाडेतत्वाचा करार, कालावधी हा फ्रेंन्चाईज कराराच्या कालावधी एवढाच किंवा त्यापेक्षा जास्त असावा. सदर जागेचा भोडे हे लिहुन देणार यांनी दयावयाचे आहे.

३) लिहुन देणार यांनी आर्किटेट, इंटेरियर डिझायनरची नियुक्ती करून सदर दुकानाचे अंर्तबाहय फर्नीचर, सजावट, सी. सी. टी. व्ही कॅमेरे, बिलींगचे मशीन, सॉफ्टवेअर, व्सवसायाचे बोर्ड, फलक, किचन साहीत्य वगैरे स्वखर्चाने करावयाचे आहेत. माथ त्यासाठी डिझाईन /

संकल्पना हि लिहुन घेणार यांची असेल त्यासाठीचा खर्च लिहुन देणार यांनी करावयाचा आहे.

लिहून देणार यांना लिहुन घेणार यांचे लेखी संमतीशिवाय व्यवसायाची जागा बदलता येणार नाही.

४) सदर व्यवसायाचा ब्रॅण्ड, ट्रेटमार्क, लोगो यावर फक्त लिहुन घेणार कंपनीचीच मालकी आहे व राहील. लिहुन देणार यांनी फक्त करार कालावधीमध्ये लिहुन घेणार यांचे नियमावलीशी आधीच राहुन व्यवसाय करावयाचा आहे.

लिहुन देणार यांनी सदर गोष्टीचा गैरवापर, दुरपयोग किंवा दुसरीकडे वापर केल्यास लिहुन घेणार कंपीन दोघांमधील करार संपुष्टात आणुन लिहुन देणार यांचेवर कायदेशीर कारवाई करतील.

५) लिहुन देणार यांनी सदर व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या स्वखर्चाने काढावयाच्या आहेत.

उदा. शॉप ॲक्ट जीएसटी नंबर, फुट लायसन्स ट्रेड लायसन्स, गव्हेमेंट व स्थानीक स्वराज्य संस्था म. न. पा. व इतर कायदयानुसार आवश्यक आसणाऱ्या परवानग्या

ना हरकत दाखला इत्यादी हया लिहुन देणार यांनी काढावयाच्या आहेत.

६) लिहुन घेणार यांनी ठरवुन दिलेल्या नियमावील/ नियम पुस्तीका नुसार लिहुन देणार यांनी सदर व्यवसाय गोष्टी, बाबी, माहीती हया गोपनीय गुत्प ठेवावयाच्या आहेत त्या उघड होणार नाहीत याची योग्य नाही खबरदारी घ्यावयाची आहे.

७) लिहुन घेणार कंपनीने पुरविलेला कच्चा माल यावर प्रक्रिया करून लिहुन देणार यांनी सदर मालाची चहा विक्री करावयाची आहे. लिहुन घेणार कंपनीने साखर, चहा पावडर, चहा मसाला इत्यादी गोष्टी, वस्तुंचा पुरवठा करावयाचा आहे. लिहुन देणार यांनी कुठलाही वर नमुद केलेला माल (कच्चा) हा बाहेरून खरेदी करावयाचा नाही अथवा लिहुन घेणार यांनी पुरवीलेला कच्चा माल बाहेर विक्री करावयाचा नाही. लिहुन घेणार कंपनीने ठरवुन देईल त्याच प्रतवारीने व त्याच ठरावीक किमतीला लिहुन देणार यांनी उत्पादनाची चहा पेय' विक्री करावयाची आहे. बाहेरील इतर कंपनी उत्पादनाची खरेदी व विक्री करण्यास

सक्त मनाई आहे. मालाची विक्री हि बिलींग सॉफ्टवेअरच्या माध्यमातुन करण्यात यावी. लिहुन देणार यांनी सदरचा व्यवसाय लिहुन घेणार यांचे मॅन्युअल/ नियमपुस्तकेनुसार त्यामध्ये नमुद धोरण, नियम, पतवारी प्रक्रिया इत्यादी नुसार व्यवसाय करावयाचा आहे. लिहुन देणार यांनी उत्पादनाची विक्री हि फक्त किरकोळ तत्वावर दुकानात येणाऱ्या ग्राहकांना करावयाची आहे. लिहुन देणार यांनी दुकानाच्या बाहेर पार्सलच्या माध्यमातुन, ठोक पध्दतीने मेल, इंटरनेट या इलेट्रॉनिक माध्यमाद्वारे मालाची विक्री करण्यास मनाई आहे.

८) लिहुन देणार यांनी व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या कमीत कमी........ कुशल कामागारांची नियुक्ती करावयाची असुन त्यांचा पगार दयावयाचा आहे. लिहुन घेणार यांनी पुरवीलेल्या नियमावली मार्गदर्शनानुसार कामगरांची आरोग्य नपासणी, गणवेश, त्याची कामे व कार्यपध्दती अंवलबण्यात येईल लिहुन घेणार हे लिहुन देणार यांनी नियुक्त केलेल्या मॅनेजर, कामगार व इतरांसाठी व्यवस्थापन व प्रशिक्षण देण्यासाठी कार्यक्रम आखु शकतात. तसेच लिहुन देणार ठरावीक कालावधी

दरम्यान सर्व फ्रेंन्चाईजीची बैठक आयोजीत करू शकतात. सदर बैठकीत व्यवसाय चालविताना येणाऱ्या अडीअडचणी, उत्पन्न होणारे मुददे या विषयावर चर्चा करून मार्ग, उपाय योजण्यात येतील दृ

९) लिहुन घेणार कंपनीचे नाव ब्रॅण्ड ट्रेडमार्क लोगो, गुडवील यांचे वापराची परवानगीसाठी लिहुन देणार यांनी परताबा नसणारी अनामत रक्कम रू............ बॅक ........... शाखा घनादेश न.......... दि.......... (अन्वये) (इतर कर वजा जाता) लिहुन घेणार यांना दिलेली आहे. सदर रक्कम डी. डी. पे ऑर्डर, चेकने दिलेली असुन सदर रक्कम अदा होईल याची स्वार्थी व भरवसा लिहुन देणार यांनी दिलेला आहे. सदर रक्कम नमुद कालावधीत अदा न झाल्यास सदर करार तत्काळ संपुष्टात येईल.

१०) फ्रेंन्चाईझीची बंधने/ जबाबदाऱ्या

१) लिहुन घेणार कंपनीची प्रसिदधी, ख्याती, बाजारातील पत, मालाची उच्च प्रतवारी याची देखभाल करण्यासाठी लिहुन घेणार यांनी तयार केलेली नियमावली, नियम

पुस्तीकेचे काटेकोरपण पालन करून लिहुन देणार यांनी व्यवसाय करावयाचा आहे.

२) वयवसायात, वयवसायाचे ठिकाणी कुठल्याही प्रकारचे अनैनिक, गैरकृत्य, बेकायदेशीर गोष्टी होणार नाहीत असा भरवसा लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना दिलेला आहे.

३) लिहुन घेणार कंपनीने पुरविलेले व ठरवुन दिलेल्या उत्पादनाची विक्री करणे लिहुन घेणार यांची लेखी संमती शिवाय बाहेरील वस्तु किंवा माल विकण्यास मनाई आहे.

४) लिहुन घेणार कंपनीने ठरवुन दिलेल्या उत्पादन प्रतवारी नुसार ग्राहकांना सेवा पुरवीणे, चहा बनविताना लागणारे साहीत्याचे प्रमाण वेळ, प्रतवारी हया गोष्टी अत्यंत महत्वपुर्ण असुन लिहुन घेणार यांनी आखुज दिलेल्या नियमावली व मार्गदर्शनानुसार करण्यात याव्यात.

५) लिहुन देणार यांनी चहाचे दुकान वर्षाचे ३६५ दिवस चालु ठेवावयाचे आहे व्यवसायाची वेळ हि लिहुन घेणार यांनी तयार केलेल्या नियमानुसार सवनीने पाळण्यात येईल

लिहुन देणार यांनी व्यवसायासाठी आवश्यक इन्सुरन्स पॉलीसी काढावयाची आहे.

६) सदर व्यवसायाची जाहीरात लिहुन घेणार यांनी स्थानीक ठिकाणी व इतरथ करावयाची असुन लिहुन देणार यांनी सदर जाहीरातीचा होणारा खर्च दयावयाचा आहे.

७) लिहुन घेणार कंपनीने व्यवसायासाठी कच्चा माल, साखर, चहा, पावडर, चहा, मसाला, इत्यादी वस्तु पुरवायच्या आहेत. लिहुन देणार यांनी मालाची पुर्ण आगाऊ रक्कम/ ॲडव्हान्स पेमेंट करावयाचे आहे. अथवा माल देवू केल्यानंतर दिवसात रक्कम दयावयाची आहे. सदर रक्कमेचे चेक/ धनादेश न वटल्यास त्यानंतर आगाऊ रक्कम घेतल्याशिवाय माल दिला जाणार नाही. लिहुन घेणार यांनी सदर कच्चा मालाचा योग्य व आवश्यक साठा करावयाचा आहे.

८) लिहुन देणार यांनी व्यवसायाची जागा व परिसर स्वच्छ व आरोग्यदायी ठेवावयाचा आहे. पाण्याच्या टाक्या, दुधाचे स्टोरेज, किचन, काऊंटर सवच्छ ठेवायाचे आहे.

९) लिहुन देणार यांनी सदर वयवसाय चालु असताना दुसऱ्या ब्रॅन्डच्या माध्यमातुन अशा स्वरूपाचा दुसरा व्यवसाय स्वत: अथवा इतर भागीदारांच्या माध्यमातुन प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रितीने करावयाचा नाही.

१०) लिहुन देणार यांनी वस्तुची खरेदी विक्री, वस्तुची सविस्तर यादी, उत्पादनाची विक्री, बाजारस्थिती व दतर बाबींची माहीती नोंद वहयात नमुद करावी व लिहुन घेणार यांना सदर माहीती उपलब्ध करून दयावयाची आहे. लिहुन घेणार हे कोणतीही पुर्ण सुचना न देता सदर माहीती बाबी व व्यवसायाचे ठिकाणी येवुन सदर गोष्टींची पाहणी करू शकतात.

१०) व्यवसाय चालवितसनस कोणत्याही कृत्यामुळे, प्रक्रिया कृती न केल्यामुळे व्यवसायाचे आर्थीक नुकसान व जीवीत हीनी वगैरे णल्यास त्यास लिहुन देणार हे जबाबदार असतील. नैसर्गीक आपत्ती उदा. आग. पुर. भुकंप. दंगे, युध्द, संप, लॉकडाऊन वगैरेमुळे झालेल्या व्यवसायाचेग नुकसानीस लिहुन घेणार हे जबाबदार राहणार नाहीत. (असणार नाहीत) लिहुन देणार हे सदर

वयवसायावर कुठल्याही प्रकारचे कर्ज काढणार नाहीत. व कर्ज काढल्यास त्यास लिहुन घेणार हे जबाबदार असणार नाहीत. लिहुन देणार यांनी सर्व देणी स्वतः दयावयाची आहेत. तसेच सदर करारनामा हा कुठल्याही प्रकारचे कर्ज काढण्यास वापरता येणार नाही.

११) फ्रॅन्चायझरची बंधनेः— लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यास कराराच्या अटी व शर्तीस अधीन व्यवसाय चाविण्यास आहे. व्यवसायासाठी लागणार कच्चा मालाचा पुरवठा करावयाचा आहे. आणि व्यवसाय वृध्दीसाठी स्थानीक ठिकाणी वेगवेगळया माध्यमातुन जाहीरात करावयाची आहे.

१२) लेखी सुचनेने करार संपुष्टात आणणे :— लिहुन घेणार खालील घटना घल्यास लेखी सुचना देवुन करार संपुष्टात आणु शकतात.

— लिहुन देणार सदर उत्पादनांची योग्य प्रतवारी ठेवण्यात अयशस्वी झाल्यास

— व्यवसाय ठिकाणी व परिसर स्वच्छ, आरोग्यदायी न ठेवणे

— व्यवसायाचा कच्चा माल इतर अनाधिकृत विक्रेत्यांकडुन विकत घेणे, बाहेरील उत्पादनाची विक्री करणे, उत्पादनात भेसळ करणे.

— कच्चा मालाचा पुरेसा साठा ज करणे, कच्चा मालाचा देय रक्कमेस विलंअ करणे, लिहुन देणार सदर चुक दुरूस्त करणेसाठी दोन वेळा लेखी सुचना देतील, पुनरावृत्ती झाल्यास तिसऱ्या वेळेस लेखी सुचना देवुन करार संपुरूटात येईल

— व्यवासायाची गोपनीय माहीती उघड करणे, अशा स्वरूपाचा दुसरा व्यवसाय प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रितीने करणे.

— व्यवसायावर कर्ज काढणे, चुकीच्या नोंदी व अहवाल सादर करणे.

— लिहुन घेणार यांना व्यवसायाचे ठिकाणी तपासणीस व नोंद वहया तपासण्यास नकार देणे, दुकान वेळी अवेळी चालु बंद करणे, कामगारांनी प्रतिबंधीत गोष्टी सेवन, धुम्रपान करणे, करारातील अटी व शर्तांचा भंग करणे.

१३करार संपुष्टात आल्यानंतर लिहुन देणार यांनी खालील गोष्टी करावयाच्या आहेत.

मालाची उत्पादन व विक्री तत्काळ थांबवणे, व्यवसाय बंद करणे, व्यवसायाचे नाव ब्रॅण्ड, ट्रेडमार्क, लोगो, गुडविल चा वापर बंद करणे व्यवसायाच्या सर्व गोपनिय गोष्टी, माहिती नियम माहिती पुस्तिका, नोंद वहया, अहवाल, ऑर्डर व प्राईस बुक, जाहिरातीचे साहित्य, कागदपत्रे, ब्रॉण्डेड प्रॉडक्ट , साहिल लेटर टेड, बिझनेस कार्ड इतर गोष्टी लिहून घेणार यास तत्काळ सुपुर्द करणे.

लिहुन देणार यांनी अशा स्वरूपाचा व्यवसाय प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रितीने, स्वत: किंवा इतरांच्या मदतीने पुढील दोन वर्षे करावयाचा नाही लिहुन देणार यास ब्रॅण्ड, ट्रेडमार्क, लोगो, गुडविल या इतर वापरास मनाई आहे अशा प्रकारे प्रनिबंधीन कृत्य केल्यास (व्यवसाय बंद न करणे अशा स्वरुपाचा दुसरा व्यवसाय केल्यास ) लिहुन देणार हे दरमहा एक लाख रुपये दंड देणेस पात्र राहील. तसेच लिहुन घेणार हे लिहुन देणार यांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करतील.

१४) समजुतीच्या करारातील अटी व शर्ती संबंधी वाद उद्‌भवल्यास सदर प्रकरणाचे अधिकार क्षेत्र हे फक्त पुणे न्यायालय राहील.

येणेप्रमाणे समजुतीचया करारातील अटी व शर्ती हया लिहुन देणार व लिहुन घेणार यांचेवर व तसेच त्यांच्या वालीवारसांवर बंधनकारक आहेत व राहतील. सबब त्यांचे सत्यतेकरीता सदरील करारावर वाचून, समजुन, उमजुन लिहुन देणार व लिहुन घेणार यांनी आपापल्या सहया केल्या आहेत.

करारनामा लिहुन देणार अंगठा फोटो

करारनामा लिहुन घेणार अंगठा फोटो

साक्षीदार

१) सही

नाव

पत्ता

२) सही

नाव

पत्ता